महाराष्ट्र शासन
गोंदिया वनविभाग गोंदिया

# उपवनसंरक्षक गोंदिया वनविभाग गोंदिया यांचे कार्यालय.

वनभवन टि.बी. टोली कुडवा रोड, गायत्री मंदीर जवळ, गोंदिया दुरध्वनी क्रमांक 07182 (235388) फॅक्स क्रमांक 07182 (237265)
ता. जिल्हा – गोंदिया ई-मेल आयडी- dycfgondia@mahaforest.gov.in

## ई – निविदा सुचना क्रमांक - 01/2026 – 2027 (प्रथम वेळ)

निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर निविदा दिनांक 15.05.2026 पासून पहावयास उपलब्ध आहे.

## ई-निविदा कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | वनविभाग | वनपरिक्षेत्र | कामाचे नाव | प्रत्यक्ष कामाची किमत | निविदा फार्मची किंमत + 18% GST रुपये | ईसारा रक्कम रु. 1% | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा प्रवर्ग | निविदा मंजुर झाल्यानंतर करारनाम्या वेळी भरावयची सुरक्षा रक्कम 2% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Gondia | Gondia | Construction of Residential Quarter for **DCF (T)** Gondia Premises of Revenue Colony At Gondia Survey No.448 in Range Gondia | 88,64,666/- | 1180 | 88600 | 120 Day | कंत्राटदार खुला प्रवर्ग | 177293 |
| 2 | Gondia | Gondia | Construction of Residential Quarter Type-IV (SU) for Asst. **Conservator of Forest (EGS & Wildlife)** Gondia Premises of Old Forest Colony At Gondia Nuzul Sheet No.09 in Range Gondia | 46,50,441/- | 590 | 46500 | 120 Day | मजुर सहकारी संस्था | 93009 |
| 3 | Gondia | Gondia | Construction of Compound Wall With Main Gate & Wicket Gate to Residenatal **Qtr. Type-V** DCF Gondia in the Premises of Old Forest Colony Range Gondia | 37,95,493/- | 590 | 37900 | 120 Day | मजुर सहकारी संस्था | 75910 |
| 4 | Gondia | Gondia | Construction of Compound Wall With Main Gate & Wicket Gate to Residenatal Type-IV (SU) for Asst. **Conservator of Forest (EGS & Wildlife)** Gondia in the Premises of Old Forest Colony Range Gondia | 36,73,168/- | 590 | 36700 | 120 Day | मजुर सहकारी संस्था | 73463 |
| 5 | Gondia | Navegaon Bandh | Construction of Logging Officer Office Building At.Navegaonbandh in Range Navegaonbandh | 45,10,468/- | 590 | 45100 | 120 Day | मजुर सहकारी संस्था | 90209 |

## - ई-निविदा पध्दतीचा तपशिल –

| | | |
|---|---|---|
| 1) | ई-निविदा प्रसिध्दी दिनांक - | 15/05/2026 वेळ सकाळी 09.00 वाजता पासून |
| 2) | ईनिविदा दस्ताऐवज डाउनलोड प्रारंभ (Start) | 15/05/2026 वेळ सकाळी 09.00 वाजता पासून |
| 3) | ईनिविदा दस्ताऐवज डाउनलोड समाप्त (End) | 22/05/2026 सांयकाळी 5.00 वाजता पर्यंत |
| 4) | ऑनलाईन निविदा उघडणे | दिनांक 23/05/2026 रोजी सांयकाळी 5.30 वाजता लिफाफा क्रमांक 1 (तांत्रीक दस्तावेज) उघडण्यात येईल. अपरिहार्य कारणास्तव निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार विभागीय निवड समिती, गोंदिया वनविभाग गोंदिया यांचे कडे राखुन ठेवला आहे. |

(पवनकुमार आ. जोंग)
उपवनसंरक्षक
गोंदिया वनविभाग गोंदिया

Scanned with CamScanner

# निविदा संबंधी सुचना तसेच अटी व शर्ती

१. खुला प्रवर्गातील कंत्राटदार हा महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग/ जलसंधारण विभाग/ महाराष्ट्र जिवन प्राधिकरण तसेच सक्षम प्राधिकरणाव्दारे नोंदणीकृत असुन त्यांने नोंदणीबाबतचे अदयावत तारखेचे पंजिकृत प्रमाणपत्राची छायांकित प्रत संकेतस्थळावर अपलोड करावी.

२. मजुर कामगार सहकारी संस्था हि गोंदिया जिल्हयातील असावी व महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग प्राधिकरणाव्दारेच नोंदणीकृत असुन त्यांने नोंदणीबाबतचे अदयावत तारखेचे पंजिकृत प्रमाणपत्राची छायांकित प्रत संकेतस्थळावर अपलोड करावी.

३. मजुर सहकारी संस्था यांनी उपरोक्त प्रमाणे दिलेल्या कामासंबंधी समतुल्य रक्कमेची कामे पुर्ण केल्याबाबचे प्रमाणपत्र (Work Done Certificate) जोडणे (Online Upload करावे)

४. मजुर कामगार सहकारी संस्था यांनी आपला कायमचा पत्ता, मोबाईल क्र., ई-मेल आयडी, ईत्यादी संबंधी माहिती स्वत:चे लेटर हेडवर लिहुन देणे बंधनकारक राहील. (Online Upload करावे)

५. निविदा धारकाने सर्व दस्ताऐवज बरोबर असल्याची खात्री रु.100/- चे स्टॅम पेपर वर नोटरी करुन जोडावे. (Online Upload करावे.)

६. मजुर कामगांर सहकारी संस्था हि शासनाच्या कोणत्याही विभागात काळया यादीत नसल्याचे 100/- चे स्टॅम पेपर वर नोटरी केलेले हमीपत्र जोडणे अनिवार्य आहे. (Online Upload करावे)

७. मजुर कामगार सहकारी संस्था हि **''अ ''** वर्गीकृत असल्यास नोंदणीचे प्रमाणपत्र. (Online Upload करावे)

८. मजुर कामगार सहकारी संस्था यांनी शासन निर्णय 14 जुलै,2023 अन्वये जिल्हा सहकारी संघ यांचे कडुन देण्यात आलेले काम करण्याची पतदारी/आर्थिक पात्रता असल्याचा दाखला मजुर सहकारी संस्थांनी सादर करणे आवश्यक आहे. (Online Upload करावे)

९. मजुर कामगार सहकारी संस्था यांनी लेबर इन्शोरन्स् सादर करणे आवश्यक आहे. (Online Upload करावे)

१०. मजुर कामगार सहकारी संस्था यांनी सन 2025-26 या आर्थिक वर्षात रक्कम रुपये 100 लक्ष ची कामे पुर्ण केले किंवा नाही याबाबत 100/- चे स्टॅम पेपर वर प्रमाणित करावे. (Online Upload करावे)

११. निविदा फॉर्म फिचा भरणा ऑनलाईन Net बॅकींग व्दारे करावा. तसेच इसार (बयाणा) रक्कमेचा भरणा Online Net Banking व्दारे व सदर रक्कम स्वत:चे बॅक खाते मार्फत भरणा करावे. स्वत:चे बॅक खात्यातुन भरणा केल्याचे रु. 100/-चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र जोडावे. (Online Upload करावे)

१२. कामे पुर्ण करण्याकरिता तांत्रीक मणूष्यबळ असल्याचे पुरावे जोडावे. (Online Upload करावे)

१३. कामे पुर्ण करण्याकरिता साहीत्य व Machinery असल्याबाबतचे पुरावे जोडावे. (Online Upload करावे)

१४. कोणत्याही प्रकारचा लिफाफा कार्यालयात प्रत्यक्षात स्विकारण्यात /घेण्यात येणार नाही.

१५. सर्व प्रथम निविदा फी जमा झाल्याची खात्री झाल्यानंतर त्या निविदाधारकांचा तांत्रीक लिफाफा उघडण्यात येईल.

१६. लिफाफा क्रमांक 1 उघडल्यानंतर काही आक्षेप असल्यास 02 (दोन) दिवसाचे आंत कळवावे. विहित मुदतीनंतर प्राप्त आक्षेपाची दखल घेतली जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

१७. सदर कामाकरीता कमीत-कमी पात्र 02 (दोन) निविदा प्राप्त न झाल्यास सदर कामाची निविदा प्रसिध्दी न करता सदर निविदे करीता ७-७ दिवसाची मुदत वाढ देण्यात येईल.

१८. निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा 10% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निवीदाधीन किमतीच्या 1% टक्के एवढया किमतीची बॅकेची प्रतिपुर्ती हमी/ तेवढया रकमेचा Demand Draft परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणुन निविदेच्या लिफाफा क्र.2 मध्ये सादर करावी. तसेच (Scan करुन ई-निविदेसोबत सादर करावी.) (उदा.1% ते 10% कमी दर - 1% रक्कम). तसेच

अ) देकार 10% पेक्षा जेवढया जास्त दराने आहे तेवढया रकमेचा व वरील बाबी प्रमाणे बॅकेची प्रतिपुर्ती हमी/DD निविदे सोबत लिफाफा क्रमांक 2 मध्ये सादर करावी. (उदा.14% कमी दर – 10% पर्यंत करिता – 1% व (14% - 10%) – 4% असे एकुण 5%) ही रक्कम रुपये 1000/- पेक्षा कमी असल्यास किमान रुपये 1000/- (एक हजार) ची बॅकेची प्रतिपुर्ती हमी DD सादर करणे अनिवर्य राहील.

ब) देकार 15% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम DD द्वारे सादर करणे अनिवार्य राहील. उदा.19% कमी दर – (19 – 15 = 4% x 2 = 8%) (शासन निर्णय क्र.सा.बा.वि.सीएटी/2017/प्र.क्रं.08/इमा-2 दि. 27/09/2018 अन्वये )

१९. तांत्रीक लिफाफा क्रमांक 1 मध्ये निविदाधारकांनी, निविदा फी /अनामत रक्कम (Net Banking) व्दारे भरल्याबाबतचे पत्र, Work in Hand Details, नोंदणीकृत कंत्राटदाराचे पंजीयन प्रमाणपत्र/वर्गीकरण/इन्शुरन्स, वर्कडन सर्टीफिकेट, जीएसटी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, Professional Tax Clearance प्रमाणपत्र, मागील ३ वर्षाचे आयकर रिटर्न, दुरध्वनी क्रमांक, ईत्यादी आवश्यक दस्ताऐवज अपलोड केल्यानंतरच निविदाधारकांचा दराचा लिफाफा क्रमांक 2 उघडण्यात येईल.

२०. निविदा स्विकृत झाल्याबाबत लेखी कळवताच 5 दिवसाचे आंत कंत्राटदारास त्यांचे मंजुर निविदा रक्कमेच्या आधारे योग्य त्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करावा लागेल. स्टॅम्प पेपरचा खर्च संबंधीत मंजुर निविदा धारक यांचे कडे असेल.

२१. अधिकृत डी.एस.सी. प्राप्त करुन घेवून मराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर स्वत: नोंदणी करुन केवळ ईनिविदा पध्दतीने निविदा सादर करावी.

२२. या निविदेची सर्व कार्यवाही शुध्दीपत्रे महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहतील.

२३. महाराष्ट्र शासनाचे कामगार विषयक कायद्यांच्या व नियमांचे पालन करण्यात येईल याबाबतची सर्वस्वी जवाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.

२४. निविदेमध्ये दर्शविलेल्या सबंधीत कामाचे माहिती, अटी व शर्ती करीता तसेच अंदाजपत्रकीय व इतर माहिती करीता उपवनसंरक्षक गोंदिया वनविभाग गोंदिया यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस सोडून) उपलब्ध होवू शकेल

२५. या कार्यालयाचे निविदा स्विकृत झाल्याबाबतचे पत्र प्राप्त झाले नसल्यास त्यांची निविदा रद्द झालेली आहे असे गृहीत धरण्यात यावे.

Scanned with CamScanner

२६. कामा दरम्यान कोणतेही जिवित / वित्तीय हानी झाल्यास त्यास वनविभाग जवाबदार राहणार नाही तसेच कामा दरम्यान कोणतेही शासकीय मालमत्तेचे नुकसान होणार नाही यांची दक्षता घ्यावी तसे झाल्यास शासकिय नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. त्याच प्रमाणे भारतीय वन अधिनियम, 1927 तसेच वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 व महाराष्ट्र वन नियमावली 2014 चे भंग होणार नाही यांची दक्षता घेण्यात यावे व नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास नियमाप्रमाणे संबंधीत कंत्राटदार यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात येईल.

२७. कार्यारंभ आदेशापासून कोणत्याही परिस्थितीत कामे वरील प्रमाणे दिलेल्या दिवसाचे विहित मुदतीत पुर्ण करावी लागेल. विहीत मुदतीत काम पुर्ण न झाल्यास प्रतिदिवस 500/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

२८. शासकीय नियमाप्रमाणे कामाचे देयकातून (इन्कम टॅक्स/ GST(शासन स्तरावरुन वेळोवेळी पारीत होणारे नविन दरानुसार) / सुरक्षा ठेव राशी, मजुर कल्यान निधी, विमा व इतर कर) इत्यादी कपात करण्यात येईल. काम पुर्ण झाल्यानंतर काम समाधानकारक असल्यास कपात केलेली सुरक्षा ठेव राशी (Defect Liability Period) संपल्यानंतर परत करण्यात येईल.

२९. कामाची गुणवत्ता राखण्यासाठी अंदाजपत्रकात नमुद केल्याप्रमाणे साहित्य वापरावे लागेल. तसेच बाजार दरातील तफावतीनुसार वाढीव दर अनुज्ञेय राहणार नाही.

३०. कामे अर्धवट स्वरुपात टाकुन दिल्यास केलेल्या कामाची कोणतेही रक्कम दिली जाणार नाही. तसेच परस्पर दुस-या कंत्राटदारास कामे हस्तांतरीत करता येणार नाही. मात्र सदरहु कामे पुर्ण करण्यास या विभागास दुस-या कंत्राटदारास दयावी लागल्यास व अशावेळी मंजुर निविदेपेक्षा जास्त खर्च झाल्यास तो आपल्याकडून वसुल करण्यात येईल.

३१. कामाची पुर्ण रक्कम ही संबधित वनपरिक्षेत्र अधिकारी तथा प्राधिकृत अधिकारी यांनी कामाच्या गुणवत्तेच्या तसेच कामे पुर्णत्वाचा दाखला या कार्यालयास सादर केल्याशिवाय मिळणार नाही.

३२. बयाना (Advance) अग्रिम देण्याची तरतुद नाही.

३३. निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार विभागीय निवड समिती यांनी राखुन ठेवला आहे.

३४. निविदा दरात समान दर आल्यास त्याबाबतचे अंतीम निर्णय घेण्याचे संपुर्ण अधिकार विभागीय निवड समितीयांचेकडे राखीव ठेवण्यात आलेले आहे. वरील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा किंवा कोणतेही कारण न दर्शविता एखादी बाब किंवा पुर्ण निविदा रद्द करण्याचा अधिकार विभागीय निवड समिती यांनी राखुन ठेवलेले आहे.

३५. कामाचा प्रत्येक पुढील टप्पा वनपरिक्षेत्र अधिकारी/ वरिष्ठ अधिकारी यांचे पुर्व परवानगी शिवाय सुरु करता येणार नाही.

३६. प्रत्यक्ष कामे सुरु करण्यापुर्वी, प्रथम कामासाठी लागणारे साहीत्य कामाचे ठिकाणी पोहचवून साहीत्य दर्जेदार असल्याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी/ सक्षम यंत्रणा यांनी प्रमाणित केल्याशिवाय कामे सुरु करता येणार नाही.

३७. संबंधीत संस्था यांनी त्यांच्या नोंदणी संबंधाने सर्व अद्यावत या निविदेमध्ये मागणी केलेली कागदपत्रे PDF स्वरुपात प्रथम दर्शनी वाचण्यायोग्य सादर करावे. वाचण्यायोग्य कागदपत्रे जोडले नसल्यास सदर कंत्राटदारास वगळयात येईल. सर्व कागदपत्रे Online PDF स्वरुपात संकेतस्थळावर अपलोड करावे अन्यथा निविदा स्विकारण्यात येणार नाही व त्यांना अपात्र घोषीत करण्यात येईल.

(पवनकुमार आ. जोंग)
**उपवनसंरक्षक,**
**गोंदिया वनविभाग गोंदिया**

Signature Not Verified

Digitally signed by PAVANKUMAR APPASAHEB JONG
Date: 2026.05.15 14:19:34 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with CamScanner